
# चिकू चिकू चिकोरी

सौ. मनिषा बर्वे

म. ग्रं. सं. गे.
विषय बाल
दा. क्र. ३०२



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
सौ. मनीषा बर्वे यांनी दिलेले पुस्तक.
3090
28/70/68

चि. मृदुल हिस,

**आजी आबांची लाडुली छकुली**
**दुधावरची साय, आमची मृदुली**
**"मोया" गोड, पापा गोड गोड**
**चिक् चिक् चिकोरी, गोडच गोड ॥**

अनेक उत्तमोत्तम आशीर्वादांसह

**ही " चिक् चिक् चिकोरी "**

---

माझ्या छोट्या दोस्तांनो,

तुम्हाला खाऊ, मेवा हे तर आवडतंच. पण कधी कधी चटकदार पदार्थ सुध्दा आवडतात. होय ना ? पण या पेक्षाही वेगळा असा 'चिक् चिक् चिकोरी' चा काव्यात्म मेवा फक्त तुमच्यासाठी.

तुम्ही या कविता वाचाल, तुम्हाला त्या गुणगुणाव्याशा वाटतील आणि त्या कविता तुम्ही म्हणत असताना तुमच्या चेहऱ्यावरचा निरागस आनंद हाच माझा आनंद असेल.

मग आवडेल ना हा मेवा ?

हा मेवा तुमच्यापर्यंत आणून पोचवण्यासाठी अनेकांचं सहकार्य लाभलंय. मुलांनो या कवितांना सजविण्यासाठी श्री. राजन काळसेकर यांनी अविश्रांत मेहनत घेतलीय. तसच श्री. चंद्रकांत वैद्य यांनी तुमच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन कवितेच्या अर्थानुरूप चित्र सुध्दा काढून दिलीत. कुमार मेस्त्री, कुमार कांचन उलवेकर या बालचित्रकारांनीहि खूप छान साथ दिली. आपले मुद्रक जय-भारत प्रेसचे मालक श्री. घाटपांडे यांनी सुरेख छपाई थोडक्या वेळात करून दिली. तर 'अटकमटक' च्या काळसेकर व फडणीस काकांच्या व म. शं. बर्वे यांच्या सहकार्याशिवाय हे पुस्तक निघूच शकले नसते. याशिवाय अन्य कितीतरी जणांनी मदत केली प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष. या सर्व मंडळींचे मनःपूर्वक आभार. प्रा. प्रवीण दवणे यांच्या शुभेच्छा तर केवळ बहुमोल. धन्यवाद !

- सौ. मनीषा बर्वे

प्रकाशक : 'अटकमटक' बालनाट्य संस्था प्रकाशन,
पुष्प ४ थे,
३०, मांगल्य, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१.



© सौ. मनीषा म. बर्वे,
बी-३०, मांगल्य, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१.



मुद्रक : जय-भारत प्रिंटिंग प्रेस,
नाईकवाडी, ठाणे.

मुखपृष्ठ : श्री. राजन काळसेकर,
निर्मिती ॲड., मुलुंड, मुंबई - ४०० ०८१.
फोन : ५६४ ५१ १४

चित्रे : श्री. चंद्रकांत वैद्य, श्री. राजन काळसेकर.

प्रथमावृत्ती : २९ एप्रिल १९९२

मूल्य : पंधरा रुपये.

# अभिनंदनीय ......

प्रवीण दवणे,
बी–३०३, राजहंस,
लुईसवाडी, ठाणे (प.)

'करी मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभूशी तयाचे' ही केवळ काव्यपंक्ती नाही. तर मुलांचं निरागस मनोरंजन करणे हे एक व्रत आहे. तो एक वसा आहे. हा वसा जपण्याचाही एक वसा घ्यावा लागतो आणि तो सौ. मनीषा बर्वे यांनी घेतलेला आहे. आज 'टी. व्ही. – व्हि. डी. ओ.' मुळे नवी पिढी फक्त 'बघणारी' होत आहे. त्यांना 'वाचणारी' पिढी करण्यासाठी सर्व सृजनशील लेखक–कवींनी मुलांसाठी आपली लेखणी पाझरती करण्याची गरज आहे. 'सोपं लिहिणं हे सर्वात कठीण आहे' असं आचार्य अत्रे म्हणत असत. त्याचा प्रत्यय मुलांसाठी लिहायला बसल्यावर येतो. एकाएकी मुलांसाठी लिहिता येत नाही. त्यासाठी मुळात मुलांवर प्रेम लागतं, माया लागते. सौ. मनीषा बर्वे या हाडाच्या शिक्षिका आहेत आणि काळजाच्या कलावंत आहेत. त्यामुळे मुलांना समजून घेऊन त्यांची बालगीते एखाद्या फुलराणीसारखी उमलली आहेत. या माझ्या विधानाचा प्रत्यय ''चिक् चिक् चिकोरी'' या त्यांच्या काव्यसंग्रहातून बालवाचकांना ठायी ठायी येईल. 'गुपित' 'का–का–का' 'फुलपाखरू' 'पावसाच्या थेंबा' या सारख्या कवितेतून बालमनाची कोवळीक त्यांनी किती तरलतेने ओळखली हे कळेल. तर 'कोल्होबाची 'फ', 'प्राण्यांची सभा' 'मनुताईचा फराळ' अशा कवितांतून त्यांच्यात दडलेली मिस्किलता मुलांना आवडेल, हसवेल, त्यांचे मन फुलवून टाकेल.

त्यांचा एक कवीस्नेही म्हणून त्यांच्या वाटचालीला शुभेच्छा तर आहेत पण या अभिनंदनपर प्रास्ताविकातून त्यांना मुलांसाठी आणखी मधुर, आणखी सुरेल लिहिण्याची प्रेरणा मिळावी ही प्रार्थना.

**– प्रवीण दवणे**

# चिक् चिक् चिकोरी

3090
वा.वा


चिक् चिक् चिकोरी,
चॉकलेट सोनेरी ।
चिकोरी देश,
सोनेरी वेश ।
रुपेरी लाटा,
पांढरा फेस ।
राऊला दिसला,
दूरचा दिवा ।
मनांत म्हणाला,
'हवाय मेवा'' ।
आईस्क्रीमचा डोंगर,
बर्फीचं झाड ।
रसगुल्ल्यांचं घर,
जिलब्यांचे माड ।
नदी बासुंदीची,
तळी श्रीखंडाची ।
मज्जाच मज्जा,
इथे खाऊची ।
राऊ म्हणे आऊ,
झाडं चिकोरीची लावू ।
मजेच्या वाटेनं,
गात गात जाऊ ।


# हूल

हिरवं हिरवं पान,
पिवळं पिवळं फूल,
फुलानं घातली
सोनेरी झूल ।

फुलाच्या कानात
इवले इवले डूल,
दंवाला पडली
हलकेच भूल ।

फुलाच्या शेजारी,
बसला बुलबुल ।
धुक्यानं दिली त्याला
छानशी हूल ।।





# खेळ

फूल लागलं फुलायला,
रंग लागले खुलायला ।।

किरण आले खेळायला,
आभाळ लागलं हसायला ।।

पान लागलं झुलायला,
बाळ लागलं नाचायला ।।

# कोल्होबाची 'फ'



लबाड कोल्हा,
गोड गोड बोलला ।

ऊस सोलला,
चोरून खाल्ला ।

माकडाने केले,
टुक टुक टुक ।

चुकली उडी,
पडला गडी ।

वेलीची द्राक्षे,
बघत बसला ।

कोल्हा म्हणाला,
हुप हुप हुप ।

रानात जाऊन
मारली दडी ।





# डोंगर झाला म्हातारा

डोंगर झाला म्हातारा,
हळुहळु लागला वाकायला.

पाठ झाली सपाट,
पोट गेलं खपाट.

ढगाला म्हणाला लागली भूक,
आभाळ म्हणालं बैस गुपचुप.



# लालू आणि कालू

लालूनं कालूचा धरला कान,
कालूनं हलवली हळूच मान.

गायला लागलं हिरवं रान
लालू–कालूनं घेतली तान.

आवडली तान, भुललं रान,
वाजली टाळी, रंगलं गान.



# प्राण्यांची सभा


काचेच्या पेटीत प्राण्यांची सभा,
वाकड्या मानेचा उंट आहे उभा ।

जिराफाची लांब मान, अंगी चट्टे पट्टे,
वाकड्या शेपट्या हलविणारे, कुत्रे धट्टे कट्टे ।


डोलाविते मान मण्यांची बाहुली ही छान,
चांदण्यांचा झगा घाले मनुली ही सान ।

हत्तीबाबा मधे उभे, ससोबा बसलेले,
घोडे तगडे उभे अन् हरण सांबर चाले ।

मण्यांचेच डोळे त्यांचे चमकदार मोठे,
पाहताना वाटे थवा मित्रांचा हा भेटे ।।



# गुपित



चांदोमामा रंग तुझा
पांढरा कसा बाई ?
काळ्या काळ्या ढगांनी
मळत कसा नाही ?
पांढरे दोन ससे घेऊन
चालतोस कसा ?
हरणांची जोडी
पळवतोस कसा ?
एवढं मोठ्ठं आभाळ
चालता, दमत कसा नाहीस ?

चांदण्यांशी खेळतोस
कुणी चिडवत कसं नाही ?
गुपित हे सारं
मला उलगडत नाही.
सारे म्हणतात,
'तुला काही कळतच नाही.'

# मनुताईचा दिवाळीचा फराळ



मनुताई बसल्या फराळाला,
कुणी नको म्हणजे माझ्या पंगतीला ।

उंदीरमामांची केली ‘चटणी’
‘तोंडी लावणं’ एकच चिमणी ।

डेऱ्यातलं ताक अन् थोडंसं लोणी,
ढेकर दिली वर पिऊन पाणी ।

सुपारी जाड जाड सायीची,
अजबच दिवाळी मनुताईची ।।


# उंदीर भाऊंचा प्रवास

खुशीत आले उंदीरभाऊ, म्हणाले ''मनीमाऊ – मनीमाऊ,
आपण दोघे बहीण–भाऊ, दूर दूर फिरायला जाऊ ।''
बघत राहिली मनीमाऊ, मनोमनी लागली गाऊ,
'दूर दूर याला घेऊन जाऊ, चावून चघळून सावकाश खाऊ ।'



ताई झाली खुश, भाऊही खुश, जाता जाता दिसलं भाताचं तुस,
शेतात होता ऊसच ऊस, मनीला दिसली भली मोठी घूस ।
घुशीच्या मागे धावली मनी, उंदीरभाऊ घाबरले झणी,
'काय आहे कोण जाणे ताईच्या मनी, पळावे कां इथून आता पुढच्याच क्षणी ।'
घूस गेली पळून, ताई फिस्कारली, उंदीरभाऊ मागे धावू लागली,
जवळच्या बिळात दडले उंदीर भाऊ, घाम पुसता पुसता म्हणाले, 'किती मी धावू?'
पुन्हा नको असला प्रवासाचा छंद
जीवाशी खेळ, नको असंगाचा संग ।
इतक्यात बाहेर गेली धमालच उडून
मोत्या येता मनीमाऊ गेली धूम पळून ।।








# स्वप्न

आली माझ्या स्वप्नात एक छान परी,
म्हणे, ''बस पंखावर, मौज पहा तरी ।''
आकाशात दिवाळीची रोषणाई किती
जिथे तिथे चांदण्यांची घरे चमकती
दिवे काजव्यांचे डोळे मिचमिचताती,
चांदोमामा वाट पाहे हळू सांगताती
पाचूचा तो रत्नपंखी मोर तुला पाहे,
ये ना लवकर, तुला साद घालताहे ।
परीच्या त्या पंखावर बसण्या मी गेले,
'नीज' म्हणे आई तो मी धपकन पडले ।।




दिवाळीची सुट्टी
        शाळेला बुट्टी,
अभ्यासाशी कट्टी
        खेळाशी बट्टी ।
फटाक्यांची करु धमाल
भुईनळ्यांची पाहू कमाल
चकली, चिवडा, जिलबी लाल
खाण्याचा धरू एकच ताल ।।
        भाऊबीजेची ओवाळणी मोठी,
        संपेल नकळत मजेत सुट्टी ।।



# ढगोबा रुसले

ढगोबा रुसले, गाल फुगवून बसले ।
रागाने झाले लाल, आणखी हुप्प गाल ।।
हरवला ताशांचा ताल, शिजेना कुणाची डाळ ।
रुणझुण वाजवीत चाळ, खेळाया आली सकाळ ।।
सकाळ म्हणाली ढगोबांना, ''खेळायला आमच्याशी येताय ना ?''
राग मनामधे मावेना, ढगोबांना बोलता येईना ।।
सकाळ राणीने केला इशारा, रंगांनी साऱ्या घातला गराडा ।
लाल, हिरवा, पिवळा सारा, जिकडे तिकडे पडला रंगांचा सडा ।।
ढगोबा लागले पळायला, पोटात लागलं दुखायला ।
वाऱ्याने केल्या गुदगुल्या, मोठ्यानं आलं हसायला ।।
ढगोबांच्या आनंदाला आला मोठा पूर ।
खेळाचा साऱ्यांना सापडला सूर ।।

# ससा

गुबगुबीत, छोटासा मजेदार ससा।
मऊ, मऊ गोरा, गोरा कापूस जसा।
डोळ्याच्या गुंजा दोन लालच लाल।
डुडुक, डुडुक कशी आहे सुरेख चाल।
आवडता आहे हा दोस्त माझा छोटा।
ज्याच्यासंगे खेळता खेळता मजेला भातेला






# लहानपण

कुणी म्हणे लहानपण असतं मोठ्ठं छान,
मुलं म्हणे फुलं, नाजुकशी छान ।

लहान आम्ही म्हणून रागावतात सारे,
येता जाता म्हणतात, 'गप्प बसा ना रे ।'

आईबाबा देतात आम्हा धम्मकलाडू,
ताईदादा मात्र नुसतेच चिमटे काढू ।

'देवबाप्पा पुन्हा आम्हा नको करु छोटं
आईबाबांसारखं कर खूप खूप मोठं ।।'





झुक झुक चाले आमची घाटातली राणी,
थांबते ना घेण्या कोठे कोळसा वा पाणी ।

वळणांच्या ओलांडिते रांगा भरभर,
चढणही उंच उंच चढे सर सर ।

किल्लीच्याच पेट्रोलवर चाले किती छान,
अशी आहे झुक झुक राणी आमची सान ।

हात नका लावू तिला बिघडेल ताल,
रुसून बसेल बाई अन् विसरेल चाल ।।



# फुलपाखरु



गोड गोजिरे, लाज लाजरे फुलपाखरु झाले, फुलपाखरु झाले,
फुलपाखरु झाले हो मी, फुलपाखरु झाले ।। धृ. ।।

ठिपक्यांचा जरतारी सुंदर,
झगा झळकतो तनुवर निळसर
तुमच्यासाठी खेळायाला आज इथे मी आले ।। १ ।।

या मजसंगे खेळायाला,
मौज मजेने नाचायाला
तुमच्यासंगे आज येथ मी, खेळायाला आले ।। २ ।।

शाळेल त्या मारून बुट्टी,
पोटदुखीची खोटी सुट्टी
कुणा न सांगा कान गोष्ट ही, लपत छपत मी आले ।। ३ ।

या या लवकर खेळायाला,
आनंदाने गिरक्या घ्या या,
मीच चिमुकली सखी सानुली खेळायाला आले ।। ४ ।।




# कोल्होबांचा दवाखाना

कोल्होबांच्या दवाखान्यात गर्दी होती फार,
स्वलभाऊंना जडली डोकेदुखी फार ।
सोबांना झालाय म्हणजे पडसं खोकला फार,
नीसोबत कोपऱ्यात बसलीय गरीब बिचारी खार ।।

चष्मा सावरत आले डॉक्टर कोल्हे,
स्टेथॉस्कोप लावून देऊ लागले सल्ले ।
'मामांचं' कार्ड दिलं अस्वल दादाला,
पिटाळलं 'कुरतडे' सलूनच्या वाटेला ।।

सोबांना पडशासाठी दिला मोठ्ठा खोका,
णे, ''यातल्या दोन दोन गोळ्या तुम्ही चोखा ।''
नीमाऊंचं नाक सुजून झालं होतं लाल,
णे, ''दूध प्यायला किती चोरून तुम्ही काल ?''

लावून दिलं औषध लालच लाल,
म्हणे, ''आणा मालकाकडून गुपचुप थोडा माल ।'

कोल्होबांचे दिसले मोठे लबाड डाळ,
घाबरलेली खारुताई जीव घेऊन पळे ।।

# पावसाच्या थेंबा



पावसाच्या थेंबा लवकर ये,
टपटप नाद घेऊन नाचायला ये ।

छोट्या छोट्या कोंबांना हसव हसव,
हिरवी साडी मातीला नेसव नेसव ।

ढगांचं ढेरपोट फोडून ये,
साऱ्यांना चिंब भिजवायला ये ।

खोटा पैसा देऊन तुला नाही फसवणार
रुसू नको, फुगू नको, धम्माल करणार ।

मजेमजेची अंगत पंगत,
गम्माडी गंमत, जम्माडी जंमत ।।

3090



# बाहुलीचा रुसवा

रुसलीय कां माझी सोनी राणी ?
डोळ्यांत कां आलंय बाई तुझ्या पाणी ?

नाजुकशा राणीला मारलंय कां कुणी ?
मिटलीय कां बाई तुझी छोटीशी जिवणी ?

हवाय कां तुला झगा, नवा लाल लाल ?
नवे नवे डुल ? नको ! माळ नवी घाल ।

अजून कां खुलेना माझी सोनुली ?
समजलं आत्ता, तुला व्हायचंय नवरी ।।